# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २८ ऑगस्ट २०१९

## (बैठक क्र. २३५)

| अ.क्र. | विषय | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मार्गदर्शक सूचना | गृहनिर्माण |
| २ | देशातील अभिनव प्रकल्प विकसित होणार नाशिकमध्ये मेट्रो प्रकल्प राबविण्यास मंजुरी | नगर विकास |
| ३ | ओल्या कचऱ्यापासून खत तयार करणाऱ्या शहरांना मिळणार प्रोत्साहन अनुदान | नगर विकास |
| ४ | सदनिकांचे अधिकार जमीन महसूल अभिलेखात नोंदविले जाणार | महसूल |
| ५ | अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजूर | शालेय शिक्षण |
| ६ | दारुबंदी अधिनियमात सुधारणा : गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यांत गुन्हेगारांवर कडक कारवाई होणार | उत्पादन शुल्क |
| ७ | सहकारी संस्था अधिनियमात सुधारणेचा अध्यादेश संस्थेतील अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी शिक्षण निधीची तरतूद | सहकार |
| ८ | अधिनियमात सुधारणेचा अध्यादेश काढण्यास मान्यता ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या राखीव जागांवर निवडणूक लढविण्यास इच्छुकांना दिलासा | ग्राम विकास |
| ९ | ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या मानधनात दीडपट वाढ करण्याचा निर्णय | सांस्कृतिक कार्य |
| १० | बुलडाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पास तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| ११ | हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट युनिव्हर्सिटी मुंबई येथे स्थापन करण्यास मान्यता | उच्च व तंत्रशिक्षण |

| | | |
|---|---|---|
| १२ | कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या नावाने अध्ययन व संशोधन केंद्र स्थापनेस मान्यता | उच्च व तंत्रशिक्षण |
| १३ | वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासितांच्या मानधनात वाढ | वैद्यकीय शिक्षण |
| १४ | मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यास मान्यता | ऊर्जा |
| १५ | शबरी आदिवासी महामंडळास ५० कोटींची शासन हमी मिळणार | आदिवासी विकास |
| १६ | आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत वर्धा येथे नवीन कार्यालय होणार | आदिवासी विकास |
| १७ | आदिवासी विभागाची आश्रमशाळा कातकरी मुलींसाठी स्थलांतरित | आदिवासी विकास |
| १८ | राज्यातील ५० आश्रमशाळांचे इंग्रजी, सेमी इंग्रजीत रूपांतरण | आदिवासी विकास |
| १९ | एकलव्य निवासी शाळांमध्ये पाचवीपर्यंतचे वर्ग सुरू होणार | आदिवासी विकास |
| २० | मिहानसाठी ९९२ कोटींच्या अतिरिक्त खर्चास मान्यता | विमान चालन (साप्रवि) |
| २१ | मिशन मंगल चित्रपटास राज्य जीएसटी परतावा | वित्त विभाग |
| २२ | पर्यटन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य जीएसटीतून परतावा मिळणार | पर्यटन विभाग |
| २३ | नागपूरच्या बिनाकी हाऊसिंग स्किममधील झोपडपट्टीधारकांना मुद्रांक शुल्कात सवलत | महसूल विभाग |

## मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मार्गदर्शक सूचना

मुंबईतील जीर्ण व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यासह म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास तसेच उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी म्हाडाला नियोजन प्राधिकारी म्हणून घोषित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मुंबई शहरातील उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारती तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्याशी संबंधित इमारतींशी निगडित समस्या लक्षात घेता, त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक होते. त्याबाबत शासनाला सूचना करण्यासाठी ८ विधानमंडळ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सादर केलेला अहवाल, मुंबई शहरातील डोंगरी येथील इमारत कोसळल्याप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी दिलेले निर्देश तसेच गृहनिर्माण मंत्र्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध बाबींना मंजुरी देण्यात आली आहे.

मुंबई शहरातील ज्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास विकासकाने अर्धवट अवस्थेत सोडलेला आहे, तसेच विकासक रहिवाशांचे भाडे देत नाहीत, असे प्रकल्प म्हाडामार्फत संपादित करून पूर्ण करण्यात येतील. महानगरपालिकेने कलम ३५३ किंवा ३५४ नुसार नोटीस दिलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालक किंवा त्या इमारतीमधील रहिवाशांच्या प्रस्तावित गृहनिर्माण सोसायटी यांना प्रत्येकी ६ महिन्यांचा अवधी देऊन पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्याची संधी देणे, त्यांनी मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास म्हाडामार्फत भूसंपादन करून अशा इमारतींचा पुनर्विकास करणे याबाबत म्हाडा अधिनियम-१९७६ मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्यात येईल.

मुंबई शहरातील उपकरप्राप्त व त्यालगत असणाऱ्या बिगर उपकरप्राप्त इमारतींचा म्हाडामार्फत शहरी नूतनीकरण योजनेंतर्गत समूह पुनर्विकास करण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR) २०३४ मध्ये आवश्यक त्या सुधारणा नगरविकास विभागामार्फत करण्यात येतील. मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अन्वये पुनर्विकास करण्यासाठी म्हाडा यांना नियोजन प्राधिकारी (Planning Authority) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासातील विकासकांची नोंदणी व विकासकाची पात्रता निश्चित करणे, विकासकाकडून भाड्याची रक्कम आगाऊ स्वरूपात घेण्यासाठी एस्क्रो खाते (Escrow Account) उघडणे, पुनर्विकासातील बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समितीची स्थापना करणे, तसेच म्हाडा अधिनियम १९७६ मधील कलम १०३ ब अन्वये भूसंपादित केलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासास चालना देणे या सर्वांच्या दृष्टिकोनातून आवश्यक मार्गदर्शक सूचना काढण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

यापूर्वी म्हाडा किंवा म्हाडाच्या अखत्यारितील तत्कालीन प्राधिकरणांमार्फत पुनर्विकसित करण्यात आलेल्या उपकरप्राप्त इमारतींपैकी ३० वर्षे जुन्या, मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करून तेथील रहिवाशांना पुनर्विकसित इमारतीमध्ये किमान ३०० चौरस फुटाची सदनिका मिळण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

नगर विकास विभाग

## देशातील अभिनव प्रकल्प विकसित होणार
## नाशिकमध्ये मेट्रो प्रकल्प राबविण्यास मंजुरी

नाशिक महानगर प्रदेशामध्ये सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्था प्रणाली विकसित करण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबविण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये ३३ किलोमीटर लांबीची मुख्य मार्गिका व २६ किलोमीटरची पूरक मार्गिका यांचा समावेश असेल. वीज आणि बॅटरी या दोन्ही ऊर्जास्त्रोतांचा वापर या प्रकल्पात होत असल्याने तो देशात अभिनव ठरणार आहे.

नाशिक हे राज्यातील वेगाने विकसित होणारे शहर आहे. नाशिक महानगर प्रदेशामध्ये असलेली गावेही झपाट्याने वाढत आहेत. नाशिक शहर व आसपासच्या प्रदेशाची गरज लक्षात घेता राज्य शासनाने अत्याधुनिक सार्वजनिक परिवहन प्रणालीच्या (MRTS - Mass Rapid Transit System) स्वरुपात परवडणारी, प्रदूषणमुक्त व हरित, ऊर्जा प्रेरक आणि विश्वसनीय अशी सार्वजनिक परिवहन प्रणाली निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकच्या सर्वसमावेशक वाहतूक व परिवहन आराखड्याआधारे तसेच शहरातील अरुंद, दाटीवाटीच्या रस्त्यांची गरज लक्षात घेऊन मेट्रो ही सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्था विकसित करण्यात येत आहे.

नाशिक मेट्रो प्रस्तावानुसार, दोन मुख्य मार्गिकांवर वीज आधारित मेट्रो यान चालविण्यात येतील. यामध्ये गंगापूर ते नाशिक रोड रेल्वे स्थानक ही मुख्य उन्नत मार्गिका क्रमांक १ असेल. त्याची लांबी २२.५ किमी राहणार असून त्यामध्ये २० स्थानके असतील. तर गंगापूर ते मुंबई नाका ही मुख्य उन्नत मार्गिका क्रमांक २ राहणार असून त्याची लांबी १०.५ किमी असेल व त्यात १० स्थानके असतील.

या दोन मुख्य मार्गिकांची क्षमता वाढविण्यासाठी मुंबई नाका ते सातपूर कॉलनी असा ११.५ किमी आणि नाशिक स्थानक-नांदुरनाका मार्गे शिवाजीनगर असा १४.५ किमी असा एकूण २६ किमीचा पूरक मेट्रो मार्ग बांधण्यात येणार आहे. या पूरक रस्त्यांवर बॅटरीवर धावणारे मेट्रो यान चालविण्यात येतील. पूरक मार्गांमुळे मुख्य मेट्रो मार्गांवर पोहोचणे नागरिकांना सुलभ होईल. या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे २१०० कोटी इतका आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमीटेड (महा-मेट्रो) या विशेष उद्देश वहन कंपनीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात राज्य शासन, केंद्र शासन, नाशिक महानगरपालिका, सिडको, एमआयडीसी यांचा आर्थिक सहभाग राहणार आहे.

-----o-----

नगर विकास विभाग

## ओल्या कचऱ्यापासून खत तयार करणाऱ्या
## शहरांना मिळणार प्रोत्साहन अनुदान

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत (नागरी) शहरांमधील विघटनशील (ओल्या) कचऱ्यापासून तयार करण्यात येणाऱ्या कंपोस्ट खत (City Compost) निर्मितीला व वापराला चालना देण्यासाठी प्रोत्साहन अनुदान देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. तसेच, घनकचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी करुन कचरामुक्त मानांकनात तीन तारांकित मानांकन प्राप्त करणाऱ्या शहरांना १ जानेवारी २०२० पासून विवेकाधीन अनुदाने (Discretionary Grants) प्राधान्याने देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची (नागरी) अंमलबजावणी मिशन मोड पद्धतीने सुरु आहे. राज्यातील नागरी भाग हागणदारीमुक्त केल्यानंतर आता घनकचऱ्याचे व्यवस्थापन करुन शहरे स्वच्छ

करण्याची कार्यवाही सुरु आहे. यामध्ये ओला व सुका कचरा वेगळा करुन त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे, हा घनकचरा व्यवस्थापनाचा मुख्य भाग आहे. याआधी बहुतांश शहरांमध्ये घनकचऱ्यावर प्रक्रिया न करता तो डंपिंग साईटवर टाकण्यात येत होता. राज्यामध्ये विविध शहरांमध्ये घनकचरा साठवणुकीमुळे विविध समस्या निर्माण होत होत्या. या समस्येवर मात करण्यासाठी शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण करणे, वेगळ्या केलेल्या घनकचऱ्यापैकी विघटनशील (ओल्या) कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणे या बाबींना चालना, प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

शहरांमधील विलगीकृत विघटनशील घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून त्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन मिळावे तसेच शेतकऱ्यांमार्फत या सेंद्रीय खताचा वापर मोठ्या प्रमाणावर व्हावा, यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १,५०० रुपये प्रति मेट्रिक टन किंवा शासन ठरवेल एवढे प्रोत्साहन अनुदान निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार देण्यात येईल.

ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची अंमलबजावणी करून कचरामुक्त शहरांच्या तारांकित मानांकनात तीन तारांकित मानांकन प्राप्त करतील अशाच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १ जानेवारी २०२० पासून शासनामार्फत देण्यात येणारी विवेकाधीन अनुदाने (Discretionary Grants) प्राधान्याने देण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

महसूल विभाग

## सदनिकांचे अधिकार जमीन महसूल अभिलेखात नोंदविले जाणार

इमारतीमधील सदनिकांचे अधिकार हे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमामध्ये समाविष्ट करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या अनुषंगाने प्रारुप नियम तयार करुन राजपत्रात प्रसिद्ध केले जातील. त्यावर जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ मधील तरतुदीनुसार भूमी अभिलेख ठेवण्यात येतो. या भूमी अभिलेखावर भोगवटादार, इतर हक्क, कूळ इत्यादी बाबींची नोंद होते. अशा जमिनीवर जर बहुमजली इमारती असतील तर त्यावरील सदनिकांचे मालक कोण याबाबत महसूल विभागाच्या अधिकार अभिलेखात नोंद नसते. ही उणीव भरुन काढण्यासाठी सदनिकांचे अधिकार अभिलेख तयार व्हावेत, यासाठी "महाराष्ट्र जमीन महसूल इमारतीमधील सदनिकांचे अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम २०१९" हे नियम तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने हे प्रारूप नियम राजपत्रात प्रसिद्ध करून जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत.

प्रस्तावित नियमांनुसार, इमारत असलेल्या जमिनीच्या अधिकार अभिलेखासोबत अशा इमारतीमधील सदनिकांची मालकी व चटई क्षेत्र दर्शविणारी एक पुरवणी मिळकत पत्रिका तयार करण्यात येईल. संबंधित जमिनीचे धारक किंवा प्रवर्तक किंवा विकासक हे सदनिकेची विक्री करण्यापूर्वी या नियमानुसार भूमापन अधिकाऱ्यास किंवा ग्राम अधिकाऱ्यास अर्ज करून सदनिकेची नोंद घेऊन पुरवणी मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी कळवतील. त्याचप्रमाणे, सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतींच्या बाबतीत देखील कोणत्याही सदनिकाधारक, सहकारी गृहनिर्माण संस्थेने प्राधिकृत केलेली व्यक्ती किंवा प्रवर्तक किंवा विकासक किंवा अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव किंवा सदनिकाधारक संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव हे सदनिकानिहाय नोंदी घेऊन पुरवणी मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी अर्ज करु शकतील. तसेच, दुय्यम निबंधक कार्यालय हे सदनिकांची नोंदणीकृत दस्ताबाबतची माहिती संबंधित प्राधिकाऱ्यांना कळवतील.

हे नियम अंतिम झाल्यानंतर त्यानुसार, प्रत्येक सदनिकाधारकास त्यांच्या सदनिकांबाबत ग्रामीण क्षेत्रामध्ये पुरवणी अधिकार अभिलेख व नगर भूमापन झालेल्या क्षेत्रामध्ये पुरवणी मालमत्ता पत्रक तयार होऊन मिळेल. स्थानिक स्वराज्य संस्थेला कर रचना करण्यासाठी सुविधा होईल. या नियमांतर्गत फक्त कायदेशीर

बांधकामांबाबत पुरवणी मिळकत पत्रिकेवर नोंद घेण्यात येणार असल्याने नागरिकांना त्यांच्या इमारतीच्या वैधतेबाबत खात्री बाळगता येईल व त्यामुळे नागरिकांची फसवणूक टाळता येईल. तसेच, सदनिका तारण देणे, कर्ज घेणे इत्यादी बाबींची प्रक्रिया सुलभ होईल. महापालिका, नगरपालिका फक्त कर मिळविण्याच्या दृष्टीने सदनिकांच्या नोंदी ठेवतात. मात्र भूमि अभिलेख विभागात सदनिकांविषयी अधिकार अभिलेखात नोंदी जतन केल्यास नागरिकांना मालकी हक्काचा अधिकृत पुरावा प्राप्त होऊ शकेल. त्यामुळे सदनिकांच्या खरेदी-विक्री प्रक्रियेत सुसूत्रता येऊन ही प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल. निरनिराळ्या शासकीय संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर संस्था यांना सदनिकांच्या मालकी हक्काबाबत अहवाल (टायटल सर्च रिपोर्ट) तयार करणे सुलभ होईल.

-----o-----

शालेय शिक्षण विभाग

**अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजूर**

राज्यातील अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना आणि घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांवरील मिळून एकूण ४३ हजार ११२ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांचे मूल्यांकन करण्यात आले होते. त्यानुसार पात्र ठरलेल्या शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्याबाबत मागणी होत होती. अशा अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना तसेच यापूर्वीच अनुदानास पात्र घोषित झालेल्या मात्र प्रत्यक्षात अनुदान सुरु न करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना २० टक्के अनुदान मंजूर करण्याचे प्रस्तावित होते. त्याचप्रमाणे यापूर्वी २० टक्के अनुदान मंजूर केलेल्या शाळा व तुकड्यांना वाढीव अनुदान मंजूर करण्याचेही विचाराधीन होते. याअनुषंगाने आज निर्णय घेण्यात आला आहे.

मूल्यांकनात पात्र ठरलेल्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करुन त्यांना, तसेच उच्च माध्यमिकच्या घोषित १५ तुकड्या, त्यावरील शिक्षक व शिक्षकेतर पदांना दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

दिनांक १९ सप्टेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदान मंजूर केलेल्या तसेच दिनांक १ व २ जुलै २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुदानास पात्र घोषित केलेल्या आणि दिनांक ९ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदान मंजूर केलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळांवरील शिक्षक, शिक्षकेतर पदांना दिनांक १ एप्रिल २०१९ पासून वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

अनुदानास पात्र घोषित केलेल्या १४६ उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना तसेच अघोषित १६५६ उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर पदांना अनुदानास पात्र घोषित करुन दिनांक १ एप्रिल २०१९ पासून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

या शाळा, तुकड्या व अतिरिक्त शाखांवरील शिक्षक, शिक्षकेतर पदांना अनुदान मंजुरीसाठी सहाव्या वेतन आयोगानुसार ३०४ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी पुरवणी मागणी पुढील अधिवेशनात सादर करुन आवश्यक तरतूद करण्यात येईल.

-----o-----

दारुबंदी अधिनियमात सुधारणा

## गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यांत गुन्हेगारांवर कडक कारवाई होणार

अवैध मद्य व्यवसायात गुंतलेल्या गुन्हेगारांविरुद्ध कडक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ मध्ये सध्या असलेल्या शिक्षेतील तरतुदीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच संपूर्ण कोरडे क्षेत्र आणि विहित मर्यादा यांची नव्याने व्याख्या करण्यात आली आहे.

शासनाने गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा या तीन जिल्ह्यांमध्ये दारुबंदी जाहीर केली आहे. अवैध मद्याच्या धंद्यात मोठ्या प्रमाणात नफा होत असल्यामुळे या जिल्ह्यांत सामाजिक तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. या जिल्ह्यातील अवैध मद्य उत्पादनासह त्यांची वाहतूक व विक्री या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींकडून तक्रारदाराला किंवा अधिकारी-कर्मचाऱ्यांना दमदाटी व मारहाण केली जाते. त्यामुळे अवैध मद्य व्यवसायात गुंतलेल्या गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ मध्ये सध्या असलेल्या शिक्षेतील तरतुदीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजच्या निर्णयानुसार संपूर्ण कोरडे क्षेत्र आणि विहित मर्यादा यांची नव्याने व्याख्या करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कलम ६५, ६६, ६८, ८३, ८५, ८६ नुसार दारुबंदी क्षेत्रात वाढीव शिक्षेच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदी तातडीने अंमलात आणण्यासाठी अध्यादेश काढण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

नवीन व्याख्येनुसार संपूर्ण कोरडे क्षेत्र (Absolutely Prohibited Area) म्हणजेच राज्यातील असा जिल्हा किंवा जिल्हे किंवा जिल्ह्याचा भाग. त्याठिकाणी शासनाने जनहितार्थ अधिसूचनेद्वारे दारुबंदी जाहीर केलेली असावी. त्या क्षेत्रात घाऊक व किरकोळ मद्य विक्रीस मनाई केली जाईल. तसेच या क्षेत्रात मद्य विक्रीच्या परवानग्या मंजूर केलेल्या असल्यास त्या शासन आदेशान्वये रद्द केलेल्या असतील. अशा क्षेत्रास संपूर्णत: कोरडे क्षेत्र संबोधण्यात येईल. त्याचप्रमाणे विहित मर्यादा (Prescribed Limit) म्हणजे शासन आदेशाद्वारे ज्या मर्यादेपर्यंत मद्य बाळगण्याची मर्यादा ठरवून दिली जाईल अशा मर्यादेस विहित मर्यादा संबोधण्यात येईल. तसेच परवानगीधारकाने दारुबंदी असलेल्या क्षेत्रात मद्यविक्री केल्याचे निदर्शनास आल्यास सक्षम प्राधिकारी अधिनियमामधील कलम १०४ अन्वये तडजोड शुल्क आकारणार नाहीत.

महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम २०१९ मध्ये एकूण १२ कलमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. कलम २ मध्ये विहित मर्यादा व संपूर्ण कोरडे क्षेत्राची नव्याने व्याख्या करण्यात आलेली आहे. कलम ६५, ६६, ६८, ८३, ८५, ८६ नुसार दारुबंदी क्षेत्रात वाढीव शिक्षेच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अवैधरित्या मद्याची आयात, निर्यात, वाहतूक, खरेदी, विक्री, बाळगणे तसेच जागेचा वापर सार्वजनिक दारुगुत्ता म्हणून करणे आणि कट रचणे या गुन्ह्यांसाठी सध्या किमान ३ ते ५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा किंवा किमान २५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक दंड किंवा शिक्षा व दंड दोन्ही प्रस्तावित करण्यात आले आहे. आजच्या सुधारणेनुसार पहिला अपराध घडल्यास किमान ३ ते ५ वर्षापर्यंत शिक्षा आणि २५ हजार ते एक लाख दंड अथवा जप्त मद्याच्या किंमतीच्या दुप्पट यापैकी जास्त असेल तो आर्थिक दंड आकारण्यात येणार आहे. तसेच दुसरा अपराध घडल्यास किमान ५ ते ७ वर्षापर्यत शिक्षा आणि १ लाख ते २ लाख दंड अथवा जप्त मद्याच्या किंमतीच्या तिप्पट यापैकी जास्त असेल तो आर्थिक दंड घेतला जाईल. त्याचप्रमाणे तिसरा अपराध व त्यानंतरचा अपराध यासाठी किमान ७ ते १० वर्षापर्यंत शिक्षा आणि २ लाख ते ५ लाख दंड अथवा जप्त मद्याच्या किंमतीच्या चौपट यापैकी जास्त असेल तो आर्थिक दंड वसूल करण्यात येणार आहे.

अपराधासाठी जागा वापरण्यास दिल्यास या अधिनियमांतर्गत सध्या ६ महिन्यांपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा १० हजार रुपयांपर्यंत दंड प्रस्तावित करण्यात आला आहे. आजच्या निर्णयानुसार किमान ३ ते ५ वर्षापर्यंत

कारावासाची शिक्षा किंवा किमान २५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड किंवा शिक्षा व दंड दोन्ही देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कोणतेही मादक द्रव्य सेवन किंवा वापर करणाऱ्यास सध्या पहिल्या अपराधासाठी ६ महिन्यांपर्यंत शिक्षा आणि १० हजार रुपयांपर्यंत दंड तर दुसऱ्या अपराधासाठी २ वर्षापर्यंत शिक्षा आणि २० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येतो. आजच्या निर्णयानुसार पहिल्या अपराधासाठी ६ महिन्यापर्यंत शिक्षा किंवा १० हजार रुपयांपर्यंत अथवा जप्त मद्याच्या किंमतीच्या दुप्पट यापैकी जास्त असणारा आर्थिक दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या अपराधासाठी २ वर्षापर्यंत शिक्षा किंवा २० हजार रुपयांपर्यंत अथवा जप्त मद्याच्या किंमतीच्या दुप्पट यापैकी जास्त असणारा आर्थिक दंड किंवा दोन्ही शिक्षा आकारण्यात येणार आहेत.

**विधि सल्लागार, अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक**

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दाखल करण्यात येणाऱ्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने खटले विधिवत दाखल व्हावेत, संबंधित अधिकारी व साक्षीदारांना वैधानिक सहाय्य मिळावे व गुन्हेगारांना कठोर शिक्षा होऊन राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत विधिविषयक कामांसाठी विधि सल्लागार आणि विधि अधिकाऱ्यांची एकूण ३७ पदे कंत्राटी पद्धतीने नेमण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आजच्या निर्णयानुसार विधि सल्लागार गट अ वर्गातील १ पद, विधि अधिकारी गट अ वर्गातील २० पदे आणि विधि अधिकारी गट ब वर्गातील १६ पदे अशी एकूण ३७ पदे घेण्यात येणार आहेत. त्यासाठी येणाऱ्या १ कोटी १ लाख ७६ हजार रुपयांच्या वार्षिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

सहकार विभाग

<u>सहकारी संस्था अधिनियमात सुधारणेचा अध्यादेश</u>

**संस्थेतील अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या**
**प्रशिक्षणासाठी शिक्षण निधीची तरतूद**

सहकारी संस्थांतील अधिकारी-कर्मचारी तसेच पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे प्रत्येक सहकारी संस्थेकडून निश्चित दराने व ठराविक वेळेत सहकार, शिक्षण व प्रशिक्षण निधीचे वार्षिक अंशदान घेण्याची तरतूद करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अध्यादेश काढण्यास आज मान्यता देण्यात आली.

राज्यातील सहकार संस्थांमधील कर्मचारी, अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ९७ व्या घटनादुरूस्तीनंतर २०१६ पर्यंत दहा संस्था अधिसूचित करण्यात आल्या आहेत. या संस्थांतर्फे प्रशिक्षणाचे कार्य सुरू आहे. घटनादुरुस्तीपूर्वी प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही एकमेव संस्था होती. त्यामुळे सहकारी संस्थांनी प्रशिक्षण व शिक्षण अंशदानाचा निधी कोणाकडे जमा करावा, त्याचा दर काय असावा व त्याचा विनियोग कशासाठी करावा आणि व्यवस्थापन कोणी करावे त्याचप्रमाणे त्याचे लेखे कोणी ठेवावे यासंदर्भातील प्रश्न उपस्थित होत नव्हते. घटनादुरूस्तीनंतर अधिसूचित केलेल्या दहा सहकारी संस्थांपैकी कोणत्या संस्थेने किती दराने प्रशिक्षण व शिक्षण अंशदान निधी जमा करावा, त्याचे व्यवस्थापन कोणी करावे व त्याचा विनियोग कशासाठी करावा व त्याचे लेखे कोणी ठेवावेत याबाबत स्पष्टता नसल्याने सहकारी संस्थांनी प्रशिक्षण व शिक्षण अंशदान निधी देण्याचे बंद केले व त्याचा परिणाम सहकारी संस्थांमधील पदाधिकारी, कर्मचारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व शिक्षण न मिळाल्याने संस्थांच्या कार्यक्षमतेवर झाला. त्यामुळे अधिनियमात सुधारणा करून सहकारी संस्थांकडून सहकार, शिक्षण व प्रशिक्षण निधीचे अंशदान जमा करण्याची पूर्वीपासूनची तरतूद पुन्हा सुरू करण्यात यावा असे म्हटले होते. सध्या महाराष्ट्र राज्य सहकारी

संघाशिवाय अन्य संस्थाही प्रशिक्षण देत असल्यामुळे दरवर्षी शासनास आवश्यक वाटेल अशी संस्था राज्य संघीय संस्था म्हणून घोषित करून शिक्षण व प्रशिक्षण निधीचे दर व कालावधी निश्चित करेल. तसेच या निधीचा विनियोग कसा करायचा याबाबतचे व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २४ अ चे पोट-कलम ३ मध्ये सुधारणा करण्यास आज मंजुरी देण्यात आली. तसेच यामध्ये पोट-कलम ४ नव्याने दाखल करण्यात येईल. त्यानुसार एखादी सहकारी संस्था, सहकार, शिक्षण व प्रशिक्षण निधीचे अंशदान विहित वेळेत भरणा करण्यास अपयशी ठरल्यास अशा अंशदान रकमेची वसुली जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे करण्यात येईल.

यासंदर्भात मंत्रिमंडळाने ९ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली होती. त्यानुसार विधानमंडळाच्या २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात विधेयक क्र. ७७ मांडण्यात आले. परंतु या विधेयकावर चर्चा झाली नाही. त्यामुळे हे विधेयक पुन्हा २०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चेसाठी ठेवण्यात आले. परंतु हे विधेयक चर्चेस न आल्याने विधेयकाचे रुपांतर अधिनियमात करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाही झाली नाही. मात्र, ही सुधारणा न झाल्यामुळे शिक्षण व प्रशिक्षण निधी अंशदानाचा दर निश्चित न झाल्याने सहकारी संस्थांचे पदाधिकारी तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना सहकारविषयक प्रशिक्षण घेणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे याबाबतचे अध्यादेश प्रख्यापित करण्यास राज्यपालांना विनंती करण्यास आज मंजुरी देण्यात आली.

-----०-----

ग्राम विकास विभाग

<u>अधिनियमात सुधारणेचा अध्यादेश काढण्यास मान्यता</u>

**ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या**
**राखीव जागांवर निवडणूक लढविण्यास इच्छुकांना दिलासा**

राखीव जागांसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीकडे नामनिर्देशनपत्र सादर करताना जात वैधता प्रमाणपत्र नसले तरीही त्यांना जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेता येणार आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार ३० जून २०२० पर्यंत होणाऱ्या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करता येणार आहे.

जात पडताळणी समित्यांकडील कामाचा भार प्रचंड प्रमाणात असल्याने सदस्यांना विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होत नाही. या परिस्थितीत ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमधील राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या व्यक्ती जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी निवडणूक लढविण्यापासून वंचित राहू नयेत म्हणून तसेच निवडून आल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास पुरेसा कालावधी मिळावा यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-१ क, ३०-१ क व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२ क, ४२ (६-क), ६७ (७-क) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यपाल महोदयांना अध्यादेश प्रख्यापित करण्याबाबत शिफारस करण्यात येणार आहे.

-----०-----

सांस्कृतिक कार्य विभाग

**ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या मानधनात दीडपट वाढ करण्याचा निर्णय**

राज्यातील मान्यवर ज्येष्ठ (वृद्ध), साहित्यिक कलावंतांना राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. आजच्या या निर्णयानुसार सन्मानार्थी कलावंतांचे मानधन दीड पटीने वाढणार असून त्याचा लाभ राज्यातील २६ हजार मान्यवरांना होणार आहे.

यासोबतच प्रत्येक जिल्ह्यातील सन्मानार्थींसाठी ६० इतक्या इष्टांकाची मर्यादा १०० पर्यंत वाढविण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला. सध्या अ वर्गातील कलावंतांना २१०० रुपये, ब वर्गातील कलावंतांना १८०० तर क वर्गातील कलावंतांना १५०० याप्रमाणे दरमहा मानधन दिले जात होते. यात दीड पटीने वाढ केल्याने हे मानधन अ वर्गासाठी ३१५०, ब वर्गासाठी २७०० तर क वर्गासाठी २२५० याप्रमाणे मिळणार आहे. या निर्णयाचा २६ हजार साहित्यिक-कलावंतांना लाभ मिळणार आहे.

-----o-----

जलसंपदा विभाग

**बुलडाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पास तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता**

बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील जिगाव प्रकल्पास २०१८-१९ च्या दरसूचीनुसार १३ हजार ८७४ कोटींची तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. या प्रकल्पामुळे बुलडाण्यातील ६ आणि अकोल्यातील २ तालुक्यांतील एकूण ८७ हजार ५८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

पूर्व विदर्भासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या या प्रकल्पाची उभारणी तापी नदीची उपनदी असणाऱ्या पूर्णा नदीवर करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा फायदा बुलडाणा जिल्ह्यातील २६८ तर अकोला जिल्ह्यातील १९ अशा एकूण २८७ गावांना मिळणार आहे. याशिवाय अकोला आणि बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी, औद्योगिक आणि सामाजिक विकासासाठी जिगाव प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी राज्य सरकार निर्धाराने प्रयत्नशील आहे. गेल्या पाच वर्षात शासनाने त्यादृष्टीने अग्रक्रमाने कार्यवाही केली असून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जिगाव प्रकल्पाचा समावेश राज्यपालांच्या सिंचन अनुशेष निर्मूलन कार्यक्रम आणि केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत करण्यात आला आहे.

-----o-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट युनिव्हर्सिटी मुंबई येथे स्थापन करण्यास मान्यता**

मुंबई येथे हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट युनिव्हर्सिटी या स्वंयसहाय्यित विद्यापीठ स्थापनेस आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत राज्यभरातील उच्च शैक्षणिक संस्थांच्या विषम वितरणातील मोठी तफावत दूर करण्यासाठी समूह विद्यापीठे स्थापन करण्यात येत आहेत. पुरेशा शैक्षणिक, भौतिक व तांत्रिक पायाभूत सोयीसुविधा असणाऱ्या ३ ते ५ विद्यमान महाविद्यालयांची संसाधने एकत्रित करुन ही विद्यापीठे निर्माण केली जात आहेत. याअंतर्गत मुंबईतील हसाराम रिझमल वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, (चर्चगेट) हे मुख्य महाविद्यालय व किशनचंद चेलाराम महाविद्यालय (चर्चगेट) आणि मुंबई अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय (कुलाबा) ही दोन सहभागी महाविद्यालये अशा तीन अनुदानित

महाविद्यालयांचा समावेश असलेले हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट युनिर्व्हसिटी, मुंबई (HSNC University, Mumbai) हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या नावाने अध्ययन व संशोधन केंद्र स्थापनेस मान्यता

जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राची स्थापना करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या केंद्रामुळे खान्देशातील या थोर कवयित्रीचे साहित्य व्यापक पातळीवर प्रसारित होण्यास मोठी मदत होणार आहे.

या केंद्राच्या माध्यमातून कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या साहित्याच्या अभ्यासाबरोबरच ते जागतिकस्तरावर पोहोचविण्यासाठी विविध विद्यापीठांशी करार करून भरीव प्रयत्न केले जाणार आहेत. त्यात बहिणाबाईंच्या जीवनाविषयी तसेच त्यांच्या साहित्याविषयी माहिती उपलब्ध केली जाणार आहे. लेवाबोली समाजसंस्कृती आणि समाजजीवन यांच्या समग्र अभ्यासासही या केंद्राच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाणार आहे.

खान्देशातील साहित्य-संस्कृतीच्या अभ्यासासोबत महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी १ कोटी ६३ लाखाच्या अनावर्ती आणि २७ लाख २२ हजारांच्या आवर्ती खर्चास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासितांच्या मानधनात वाढ

शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद आणि शासन अनुदानित आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील आंतरवासितांच्या विद्यावेतनात भरीव वाढ करण्यात आली असून ते ६ हजार रुपयांवरुन ११ हजार रुपये करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर संबंधित विद्यार्थ्यांना एक वर्षाची आंतरवासिता पूर्ण करणे आवश्यक असते. या काळात आंतरवासिता विद्यार्थ्यांना रुग्णालयात सेवा देण्यासाठी मासिक विद्यावेतन देण्यात येते. हे विद्यावेतन १ ऑगस्ट २०१९ पासून ६ हजार रुपयांवरुन वाढवून ११ हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी विद्यावेतन वाढीमुळे येणाऱ्या अतिरिक्त आर्थिक भारासाठी आवश्यक तरतूद करण्यास देखील मंजुरी देण्यात आली.

-----o-----

## मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यास मान्यता

शेतकऱ्यांना दिवसा सिंचन शक्य व्हावे व पारंपरिक वीज कृषीपंपांच्या जोडणी खर्चात बचत व्हावी यासाठी राज्यात १ लाख सौर कृषी पंपांची योजना राबविण्यात येत असून त्याचा दुसरा व तिसरा टप्पा राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यात शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी १ लाख सौर पंप तीन टप्प्यात उपलब्ध करुन देण्याची योजना नोव्हेंबर २०१८ पासून सुरु करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात २५ हजार सौर कृषी पंप उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात आली होती. २५ हजार कृषी पंपांना पारंपरिक पद्धतीने उच्च दाब वितरण प्रणाली जोडणी दिल्यास ६२५ कोटी रुपये तर तुलनेत सौर ऊर्जेवर उभारणीसाठी ४५४ कोटी ७२ लाखांचा खर्च येतो. म्हणजेच तुलनेत सौर पद्धतीमुळे १७० कोटी २८ लाखांची बचत होते. सौर कृषी पंपांमुळे दिवसा सिंचन शक्य तर होतेच समवेत नैसर्गिकरित्या उपलब्ध होणाऱ्या स्त्रोतावर आधारित असल्याने पर्यावरणाची हानी होत नाही. जेथे सिंचनाची क्षमता आहे परंतु विजेचे जाळे पोहोचलेले नाही अशा ठिकाणचे क्षेत्र ओलिताखाली येते. वीज जोडणी खर्च, सबसिडी, क्रॉस सबसिडी या सर्वांमध्ये बचत होते. तांत्रिक वीज हानी टळून वीज चोरीमुळे होणाऱ्या हानीपासून बचाव शक्य होतो. हे सर्व फायदे लक्षात घेता आता या योजनेतील दुसरा व तिसरा टप्पा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेच्या उर्वरित टप्पा २ व ३ साठी एकूण १५३१ कोटी रुपयांचा प्रकल्प खर्च होणार आहे. यामध्ये ३ अश्वशक्ती क्षमतेचे ५२ हजार ५०० आणि ५ अश्वशक्ती क्षमतेचे १५ हजार तर ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे ७ हजार ५०० असे एकूण ७५ हजार सौर कृषीपंप बसविण्यात येणार आहेत. टप्पा २ व ३ हे १८ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

हे सौर पंप उपलब्ध करुन देण्यासाठी विभागवार पुरवठादारांचे पॅनेल तयार करण्यात येणार असून शेतकऱ्यांना त्यामधील कोणत्याही एका पुरवठादाराकडून पंप बसवता येऊ शकेल. त्याची निवड शेतकऱ्यांना करता येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारण्यासाठी लाभार्थ्यांचा हिस्सा वगळता उर्वरित निधी हा राज्य हिस्सा, विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना, यापूर्वीच लागू केलेल्या १० पैसे प्रति युनिट अतिरिक्त वीज विक्री कर यांच्या माध्यमातून यापुढेही उभारण्यात येईल.

या योजनेत सर्वसाधारण लाभार्थ्यांना १० टक्के व अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांचे अंशदान ५ टक्के असेल. पाच एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमतेचे व ५ एकरापेक्षा जास्त शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि त्यापुढे मागणी व भौगोलिक परिस्थितीनुसार ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देण्यात येईल. सौर पंप देताना जे पैसे भरुन प्रतीक्षा यादीत आहेत (पेड पेंडिंग), अशा शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. त्यांनी भरलेली अनामत रक्कम लाभार्थ्यांच्या हिश्श्यासमवेत समायोजित करण्यात येणार आहे.

राज्यातील पारंपरिक उर्जेद्वारे विद्युतीकरण न झालेले शेतकरी, विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, महावितरण कंपनीकडे विद्युत जोडणीसाठी पैसे भरूनही प्रलंबित असणाऱ्या ग्राहक किंवा शेतकऱ्यांपैकी ज्यांना नजीकच्या काळात विद्युत जोडणी मिळणे शक्य नाही असे शेतकरी, अतिदुर्गम भागातील शेतकरी, राज्य शासनाच्या धडक सिंचन योजनेंतर्गत लाभ घेतलेले शेतकरी यांना या योजनेत प्राधान्य राहणार आहे. वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहीर, बोअरवेल, बारमाही वाहणारी नदी-नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरीदेखील पात्र राहतील.

-----०-----

## शबरी आदिवासी महामंडळास ५० कोटींची शासन हमी मिळणार

आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त विकास महामंडळाकडून कर्ज मिळण्यासाठी ५० कोटींची ठोक शासन हमी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

नाशिक येथील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून आदिवासींसाठी विविध स्वयंरोजगाराच्या योजना राबविण्यात येतात. यासाठी महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त विकास महामंडळाकडून कर्ज स्वरुपात निधी मिळत असतो. या निधीसाठी राज्य शासनाकडून ठोक हमी देण्यात येत असते. त्यानुसार आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या कालावधीसाठी ५० कोटींची ठोक हमी देण्यास मान्यता देण्यात आली. या हमीमुळे आदिवासी बांधवांसाठी विविध स्वयंरोजगार योजनांना केंद्र शासनाकडून सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध होणार आहे.

-----०-----

आदिवासी विकास विभाग

## आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत वर्धा येथे नवीन कार्यालय होणार

आदिवासी विकास विभागाच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत वर्धा येथे नवीन कार्यालय सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे वर्धा जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसाठी विकास योजना राबविण्यात गती येणार आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नागपूर अंतर्गत वर्धा व नागपूर जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असून वर्धा येथे प्रकल्पाचे उपकार्यालय सुरु आहे. नागपूर येथील कार्यालयामार्फत वर्धा जिल्ह्यातील आदिवासी जनतेला शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तथापि, हे कार्यालय वर्धा जिल्ह्यातील आदिवासी जनतेला सोयीचे नसल्याने शासनाच्या विविध योजना आदिवासी जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यासाठी नवीन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरू करण्यास आज मान्यता देण्यात आली आहे.

या कार्यालयासाठी एकूण ३६ पदे मंजूर करण्यात आली असून ३१ पदे अन्य कार्यालयांकडून वर्ग करुन उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रकल्प कार्यालय कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली उर्वरित प्रकल्प अधिकारी, सहायक लेखा अधिकारी, कार्यालय अधीक्षक व संशोधन सहायक ही चार पदे नवीन निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

आदिवासी विकास विभाग

## आदिवासी विभागाची आश्रमशाळा कातकरी मुलींसाठी स्थलांतरित

आदिवासी विकास विभागांतर्गत कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्थेकडे हस्तांतरित व स्थलांतरित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही संस्था कातकरी मुलींसाठी स्वयंअर्थसहाय्यित शाळा चालवित आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात सध्या ५०२ शासकीय व ५४६ अनुदानित आश्रमशाळा सुरु असून त्यामध्ये सुमारे चार लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यातील ४५ अनुसूचित जमातींपैकी कातकरी, माडीयागोंड, कोलाम या तीन अतिमागास जमाती आहेत. या आदिम जमातींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी केंद्र शासनाच्या मदतीतून आदिम जमातीसाठी विविध योजना स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहेत. जनजाती सल्लागार परिषदेच्या ११ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आदिम जमातीसाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरु करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या शिफारसीनुसार आदिम जमातीमधील कातकरी समाजातील मुलींसाठी शाळा चालविण्यासाठी कल्याण येथील अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्थेस आदिवासी विकास विभागातील कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा स्थलांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही संस्था कातकरी समाजातील मुलींसाठी पहिली ते सातवीपर्यंत स्वयंअर्थसहाय्यित शाळा १९९९ पासून चालवित असून या शाळेमध्ये एकूण १३४ मुली शिक्षण घेत आहेत. त्यापैकी ९४ मुली कातकरी समाजाच्या आहेत. संस्थेच्या नावावर ६५ आर जमीन असून इतर सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेस माझगाव डॉक यांनी शाळा बांधकामासाठी निधी दिलेला आहे. संस्थेला अनुदान दिल्यास त्यांना आणखी कातकरी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन चांगले शिक्षण देणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या मदतीने संस्थेमार्फत गेली ३५ वर्षात आदिवासी महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये अनेक समाजोपयोगी प्रकल्प राबविले आहेत. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्यामुळे दलितमित्र व शाहू फुले आंबेडकर पुरस्काराने शासनामार्फत गौरविण्यात आले आहे. त्यामुळे या संस्थेकडे आश्रमशाळा स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

आदिवासी विकास विभाग

## राज्यातील ५० आश्रमशाळांचे इंग्रजी, सेमी इंग्रजीत रूपांतरण

आदिवासी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या ५० आश्रमशाळांचे इंग्रजी-सेमी इंग्रजीमध्ये रुपांतरण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या शाळांमध्ये पहिलीचा इंग्रजी माध्यमाचा वर्ग सुरू करण्यासह इयत्ता ६ वी पासूनच्या वर्गांचे विज्ञान व गणित हे विषय यंदापासून इंग्रजी भाषेमधून शिकविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील सामाजिक-शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासी समुहातील विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागांतर्गत ५०२ शासकीय आश्रमशाळा चालविण्यात येत आहेत. यापैकी १२१ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण देण्यात येते. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार मराठीमधून शिक्षण देण्यात येते असून यामध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी आहेत.

आदिवासी पालकांचीही त्यांच्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश देण्याबद्दल मागणी वाढत आहे. राज्य शासनाच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याच्या योजनेंतर्गत खाजगी नामांकित शाळांमध्ये

आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश देण्यात येऊन त्याला इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षणाची मोफत सोय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत १७९ खाजगी शाळांमध्ये सुमारे ५४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, ग्रामीण भागात आणखी नवीन दर्जेदार निवासी शाळा उपलब्ध होत नसल्याने आणखी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य होत नाही. या बाबींचा विचार करुन शासकीय आश्रमशाळांपैकी पहिल्या टप्प्यात ५० शासकीय आश्रमशाळांचे रुपांतरण इंग्रजी-सेमी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे पहिल्या टप्प्यात प्रति वर्षी दोन हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांचे मेडिकल, पॅरामेडिकल, अभियांत्रिकी, तंत्र शिक्षण अशा शाखांमधील शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे.

-----o-----

आदिवासी विकास विभाग

## एकलव्य निवासी शाळांमध्ये पाचवीपर्यंतचे वर्ग सुरू होणार

नाशिकच्या महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी अंतर्गत सुरू असलेल्या एकलव्य निवासी शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंतचे वर्ग सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या शाळांमध्ये अगोदरच नवोदय विद्यालयांच्या धर्तीवर सहावी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने केंद्र शासनाने नवव्या पंचवार्षिक योजनेत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये वितरित होणाऱ्या निधीतून नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावर “एकलव्य निवासी शाळा” सुरू करण्यात आल्या. राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये २५ एकलव्य निवासी शाळा सुरू असून या शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षा मंडळाच्या (CBSE) अभ्यासक्रमानुसार सहावी ते बारावीपर्यंतचे इंग्रजी माध्यमातून मोफत शिक्षण दिले जाते.

आदिवासी पालकांचा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठविण्याचा कल वाढत आहे. एकलव्य निवासी शाळांमध्ये सीबीएसईच्या इयत्ता सहावीच्या वर्गामध्ये थेट प्रवेश देण्यात येत असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना भाषेची अडचण येते. पहिली ते पाचवी सीबीएसईचे वर्ग सुरू केल्यास विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया उत्तम असल्याने त्यांना सहावीपासून पुढील शिक्षण सुलभ होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांचे मेडिकल, पॅरामेडिकल, अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण अशा शाखांमधील शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. या २५ शाळांमध्ये पहिलीचा वर्ग सुरू केल्यामुळे प्रतिवर्षी २००० आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमात प्रवेश देणे शक्य होणार आहे.

-----o-----

विमान चालन (सामान्य प्रशासन विभाग)

## मिहानसाठी ९९२ कोटींच्या अतिरिक्त खर्चास मान्यता

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मिहान प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या ९९२ कोटींच्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करण्यासाठी मिहान प्रकल्प राबविण्यात येत आहे. मिहान प्रकल्पाबरोबरच आर्थिक उलाढालींचा विकास करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासह वेळोवेळी प्रकल्पात सुधारणा करण्यात आल्या आहेत. मिहानसाठी आवश्यक भूसंपादन, पुनर्वसन, तांत्रिक कामे, भूसंपादन अधिनियमांतर्गत दावे इत्यादी कामांसाठी १ हजार ५०८ कोटी ३६ लाखांच्या खर्चास यापूर्वीच प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. आता या कामांसाठी सुमारे ९९२ कोटी ९ लाखांच्या अतिरिक्त खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

वित्त विभाग

## मिशन मंगल चित्रपटास राज्य जीएसटी परतावा

भारतीय अवकाश संशोधन संस्था आणि अवकाश शास्त्रज्ञ यांची यशोगाथा मांडणाऱ्या मिशन मंगल या हिंदी चित्रपटाच्या तिकीट विक्रीवरील ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतचा राज्य वस्तू व सेवा कराचा परतावा देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मिशन मंगल हा हिंदी चित्रपट भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) यांच्या मंगलयान मोहिमेवर आधारित आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेमधील शास्त्रज्ञांचा संघ विशेषत: महिला शास्त्रज्ञांचे मंगलयान मोहिमेतील अमूल्य योगदान, त्यांच्या परिश्रमाची कथा या चित्रपटामध्ये दाखविण्यात आली आहे. त्यातून सकारात्मक वैज्ञानिक संदेश जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ही यशोगाथा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी या चित्रपटाच्या तिकिटावरील राज्य वस्तू व सेवा कर (स्टेट जीएसटी) परतावा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या चित्रपटासाठी, तिकीट दरावर लागू असलेला राज्य वस्तू व सेवाकर (एसजीएसटी) चित्रपटगृहांनी प्रेक्षकांकडून वसूल न करता, चित्रपटगृहाने स्वत: राज्य शासनाच्या तिजोरीत भरणा करण्यासाठी शासन निर्णय काढण्यात येईल. शासन निर्णय काढल्याच्या तारखेपासून दिनांक ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतच्या कालावधीत तिकीट विक्रीवर शासकीय तिजोरीत भरणा केलेल्या राज्य वस्तू व सेवाकराचा (एसजीएसटी) परतावा देण्यात येईल. हा परतावा देण्याची कार्यपद्धती ठरवण्याचे अधिकार वस्तू व सेवाकर विभागाच्या राज्य कर आयुक्तांना देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

पर्यटन विभाग

## पर्यटन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य जीएसटीतून परतावा मिळणार

राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने पर्यटन धोरण आखले असून त्यानुसार पर्यटन प्रकल्पांना वित्तीय प्रोत्साहने देण्यात आली आहेत. या पर्यटन प्रकल्पांना वस्तू व सेवा कर प्रणालीतील राज्य जीएसटीच्या हिश्श्यातून परतावा देण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

पर्यटन हे आर्थिक विकासाचे एक प्रमुख साधन असून पर्यटन क्षमतेचा विकास केल्यास अर्थव्यवस्थेला बळकटी येऊ शकते. तसेच या माध्यमातून रोजगार निर्मिती होत असल्याने शासनाने वर्ष १९९९, २००६ आणि

२०१६ मध्ये पर्यटन धोरणे जाहीर केली आहेत. या धोरणांमध्ये पर्यटन प्रकल्पांना विविध वित्तीय व इतर सवलती देण्यात आलेल्या आहेत. वित्तीय प्रोत्साहनांमध्ये विक्री कर, ऐषाराम कर, करमणूक कर, मुल्यवर्धित कर इत्यादी करातून सूट देण्याचा समावेश आहे. यानुसार वित्तीय प्रोत्साहनाची रक्कम व पात्रता कालावधी निश्चित करुन यापैकी ज्याची पूर्तता आधी घडेल तोपर्यंत सूट मिळत होती. मात्र, देशात वस्तू व सेवा कर ही एकच करप्रणाली १ जुलै २०१७ पासून कार्यान्वित झालेली असून त्यात करातून सूट देण्याची तरतूद नाही.

या पार्श्वभूमीवर पर्यटन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना यापूर्वीप्रमाणेच सवलती मिळणे आवश्यक होते. त्यामुळे पर्यटन धोरणानुसार वित्तीय प्रोत्साहने दिलेल्या पर्यटन प्रकल्पांना वस्तू व सेवा कर प्रणालीतील राज्य जीएसटीच्या हिश्श्यातून परतावा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने आज घेतला. परताव्याची ही रक्कम या प्रकल्पांना दिलेल्या सवलतीच्या रकमेपर्यंत किंवा पात्रता कालावधी पूर्ण होईपर्यंत यापैकी आधी घडणाऱ्या बाबीपर्यंतच दिली जाणार आहे.

-----०-----

महसूल विभाग

## नागपूरच्या बिनाकी हाऊसिंग स्किममधील झोपडपट्टीधारकांना मुद्रांक शुल्कात सवलत

नागपूरच्या मौजा बिनाकी येथील बिनाकी हाऊसिंग स्किममधील झोपडपट्टी वसाहतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या दस्तावरील मुद्रांक शुल्कामध्ये लोकहितास्तव ८० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे रहिवाशांना केवळ २० टक्केच मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे.

नागपूरच्या नाईकवाडी येथील नागनाथ बळवंत काळे यांच्या ख.क्र. १०८/१ आणि ख.क्र. १०८/२ व मौजा बिनाकी ख. क्र. ५५ येथील मालकीच्या एकूण १३.८१ हेक्टर इतक्या वडिलोपार्जीत जमिनीवरील बिनाकी हाऊसिंग स्किममधील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांसाठी आजचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. या जमिनीच्या मालकाकडून होणाऱ्या हस्तांतरण संलेख तथा दस्तावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क लोकहितास्तव ८० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत कमी करण्यात आले आहे. त्यानुसार आकारणीयोग्य असलेल्या एकूण मुद्रांक शुल्काच्या २० टक्के इतकीच रक्कम भरावी लागणार आहे.

मुद्रांक शुल्काची ही सवलत या जमिनीसाठी नागपूर महानगरपालिकेच्या २२ जानेवारी २०१९ रोजीच्या मंजूर अभिन्यास नकाशातील मिळकतीला लागू राहील. आजच्या निर्णयानुसार ज्या रहिवाश्यांच्या नावाने हस्तांतरण दस्त होणार आहेत असे रहिवासी हे बिनाकी हाऊसिंग स्किममधील झोपडपट्टीतील रहिवासी असल्याचे नागपूर महानगरपालिकेने प्रमाणित करणे आवश्यक आहे. अशा लाभार्थ्यांची प्रमाणित यादी नागपूर महानगरपालिकेकडून प्रसिद्ध केली जाणार आहे. त्याचप्रमाणे आजचा निर्णय शासन राजपत्रात अधिसूचित होऊन प्रसिद्ध होण्यापूर्वी हस्तांतरण दस्ताशी संबंधित कोणत्याही पक्षकाराने मुद्रांक शुल्काचा भरणा शासनाकडे केला असल्यास त्यांना त्याचा परतावा मिळणार नाही.

-----०-----